शुद्धिपत्र

एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

सीआयएन: यू६७१००एमएच२००७पीएलसी१७४७५९
रिटेल सेंट्रल आणि नोंदणीकृत कार्यालय : एडलवाईस हाऊस, सीएसटी रोड लगत, कालिना, मुंबई ४०००९८

लिलाव सूचनेसंबंधी दुरुस्तीपत्रक

''याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, या वृत्तपत्रात दिनांक ०३.०६.२०२६ आणि १४.०५.२०२६ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या खालील कर्जदारांशी संबंधित लिलाव सूचनेमधील **लिलावाची तारीख खालीलप्रमाणे वाढविण्यात आलेली आहे.**''

अ. क्र.	कर्जदाराचे नाव व कर्ज खाते क्रमांक :-	लिलावाची नवीन तारीख व वेळ
१.	१. खरात स्वप्नील विश्वास (कर्जदार) २. आठवले वैशाली गौतम (सह-कर्जदार) ३. परब राखी रमेश (सह-कर्जदार) एलएएन :- '६२७१५२४०२, '६२८७६३५६३ ट्रस्ट : ईएआरसी ट्रस्ट-एससी ४६९	०९-जुलै-२०२६ दु. १२:०० वा.
२.	१. श्री. गुप्ता अखिलेश चंद्रलाल (कर्जदार) आणि २. श्रीम. गुप्ता ममता अखिलेश (सह-कर्जदार) एलएएन :- ६२५२३७०४० आणि ६२६०६४४८२ ट्रस्ट : ईएआरसी ट्रस्ट-एससी ४६९	१०-जुलै-२०२६ सायं. ४:३० वा.

सदर लिलाव सूचनेतील इतर सर्व अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल झालेला नाही.
सुधारित लिलाव दिनांकाची नोंद घेण्याचे आवाहन सर्वसामान्य जनतेस करण्यात येत आहे.

दिनांक : २३.०६.२०२६ — प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : मुंबई — एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

Edelweiss Asset Reconstruction

SBI STATE BANK OF INDIA

एसएआरबी ठाणे – ११६९७ : स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी शाखा, १ला मजला, प्लॉट क्र. ए-११२, सर्कल रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे (पश्चिम)-४०० ६०४. ई-मेल : sbi.11697@sbi.co.in

स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना

जोडपत्र IV-A (नियम ८(६) चे परंतुक पहा)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार आणि हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रत्यक्ष कब्जात** घेतलेल्या तारणी धनकोंकडे गहाण/भारग्रस्त असलेली खाली वर्णन केलेली स्थावर मिळकत **श्री. सुनील जिलेदार यादव** यांच्याकडून तारणी धनकोंना येणे थकबाकी असलेल्या ०५.११.२०२२ रोजीसप्रमाणे रु. ४८,५२,०३३/- **(रुपये अठ्ठेचाळीस लाख बावन्न हजार तेहेतीस मात्र)** सह त्यावरील पुढील व्याज, आनुषांगिक खर्च आणि परिव्ययाच्या वसुलीसाठी **१७.०७.२०२६ रोजीस ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** तत्वावर विकली जाईल.

राखीव किंमत **रु. ३७,००,०००/- (रु. सदतीस लाख मात्र)** आणि इसारा अनामत रक्कम **रु. ३,७०,०००/- (रु. तीन लाख सत्तर हजार मात्र) असेल.**

इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्याआधी लिलावात ठेवलेल्या मिळकतींवरील भार, त्यांचे मालकी हक्क आणि मिळकतीला बाधा आणणाऱ्या दावे/अधिकार/सोसायटी/ बिल्डर थकबाकीबाबत त्यांची स्वतंत्र चौकशी करून घ्यावी. ह्या संदर्भात ई-लिलावाची जाहिरात म्हणजे बँकेकडून कोणतेही वचन किंवा कोणतेही सांगणे असल्याचा अर्थ काढू नये किंवा तसा समज करून घेऊ नये.

बोली लावणाऱ्यांनी, **मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड**ने अवलंबलेल्या कार्यपद्धतीनुसार आवश्यक केवायसी कागदपत्रे आणि नोंदणी शुल्क सादर करून लिलावाच्या तारखेपूर्वीच **(https://baanknet.com)** या संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करून घ्यावी.

जाहीर ई-लिलावाची तारीख आणि वेळ आहे **१७.०७.२०२६** रोजी **स. १०.०० ते दु. ४.००** प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारासहीत.

मिळकतीचे तपशील

फ्लॅट क्र. बी-९०५, गायत्री क्लासिक, सर्व्हे क्र. ९, गाव फेणे, कमिशनर बंगलो जवळ, मानसरोवर लेक समोर, भिवंडी, जि. ठाणे - ४२१ ३०२, दिनांक **२७.०७.२०२२** रोजीच्या नोंदणीकृत विक्री करार धारक क्र. ४१३५/२०२२ अन्वये **श्री. सुनील जिलेदार यादव** यांच्या नावावर असलेली मिळकत. **क्षेत्र मोजमापित** ७३.९६ चौ. मी. चटई क्षेत्र **(प्रत्यक्ष कब्जा)**

मिळकत आयडी क्र.	राखीव किंमत (रु. मध्ये)	इसारा अनामत रक्कम (रु.)	बोली वाढीची रक्कम (रु.)	निरीक्षणाची तारीख आणि वेळ
एसबीआयएन२०००६४१७०३७२	३७,००,०००/-	३,७०,०००/-	२५,०००/-	०७.०७.२०२६ स. ११.०० ते दु. २.०० वा.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनकोंची वेबसाईट : **www.sbi.co.in, https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the news/auction-notices/sarfaesi-and-others आणि https://baanknet.com** मध्ये दिलेली लिंक बघावी **किंवा श्री. चंद्रकुमार डी. कांबळे, सीएलओ मोबा. क्र. ७८७५५५१५६६ आणि अमित एम. साठे, सीओ मोबा क्र. ९८३४९३७००१ यांना संपर्क साधावा.**

सही/-
दिनांक : २०.०६.२०२६ — **चंद्रकुमार डी. कांबळे,**
ठिकाण : ठाणे — प्राधिकृत अधिकारी आणि मुख्य व्यवस्थापक, **स्टेट बँक ऑफ इंडिया**

प्रपत्र क्र. ३
[नियम-१३(१)(ए)पहा]

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज इमारत,
सेक्टर-३० ए, वाशी, नवी मुंबई- ४००७०३.

खटला क्र.: ओए/३०५/२०२६

कर्ज वसूली न्यायाधिकरण (कार्यवाही) रुल्स, १९९३ च्या नियम ५ च्या उप-नियम (२ए) सहवाचता ॲक्टच्या कलम १९ च्या उप-कलम (४) अंतर्गत समन्स.

आयडीएफसी फर्स्ट बँक लि. — नि. क्र.: ०९
विरुद्ध
राहुल लाड

प्रति,
(१) **राहुल लाड,** फ्लॅट क्र. ८, १ला मजला, ओम विवेक सीएचएसएल, गांधी नगर, रामचंद्र नगरजवळ, ऋषभ डेअरी जवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे, मुंबई, महाराष्ट्र - ४२१२०४.
तसेच येथे : ३०१, ३०२, गणेश भक्ती सीएचएसएल, ऋषभ डेअरी जवळ, गांधीनगर, डोंबिवली (पूर्व), कल्याण, ठाणे, महाराष्ट्र - ४२१२०४.
तसेच येथे : सीओ क्रिटिकेअर लाइफलाइन हॉस्पिटल, प्लॉट क्र. ८५, सेक्टर १९, व्हाईट फ्लॅग बिल्डिंग समोर, कामोठे, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४१०२०९.
(२) **स्नेहल राहुल लाड,** फ्लॅट क्र. ८, १ला मजला, ओम विवेक सीएचएसएल, गांधी नगर, रामचंद्र नगरजवळ, ऋषभ डेअरी जवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे, मुंबई, महाराष्ट्र - ४२१२०४.
तसेच येथे : ३०१, ३०२, गणेश भक्ती सीएचएसएल, ऋषभ डेअरी जवळ, गांधीनगर, डोंबिवली (पूर्व), कल्याण, ठाणे, महाराष्ट्र - ४२१२०४.

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद **ओए/३०५/२०२६** नामदार प्रबंधक/पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **१६/०४/२०२६** रोजी सूचीबद्ध केला होता.
ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ३०,८२,९६०.१३/-** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९ पोट कलम (४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).
ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-
(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या **तीस** दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
तुम्हाला **१०/०८/२०२६ रोजी स. १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **रजिस्ट्रार**समोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.
माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक: **१८/०६/२०२६** रोजी दिले.

टीप: — शिक्का — **समन्स जारी करण्याकरीता**
लागू नसलेले काढून टाका — **प्राधिकृत अधिकारांची स्वाक्षरी**

RELIANCE Infrastructure

भागधारकांना सूचना
प्रत्यक्ष शेअर्सच्या हस्तांतरण आणि डिमटेरिअलायझेशनसाठी विशेष कक्ष

दिनांक २४ एप्रिल, २०२६ रोजीच्या आमच्या वर्तमानपत्र जाहिरातीच्या पुढे आणि दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजीचे सेबी सर्क्युलर क्र. एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६ ('सेबी सर्क्युलर') नुसार, भागधारकांना पुन्हा एकदा कळवण्यात येते की, ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी जे विकले/खरेदी केले होते त्या प्रत्यक्ष शेअर्सचे हस्तांतरण आणि डिमटेरिअलायझेशन (डिमॅट) सुलभ करण्याकरिता ०५ फेब्रुवारी, २०२६ पासून ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीसाठी एक विशेष कक्ष उघडला आहे.
ह्या कक्षाचा प्रयोज्यता खालील मॅट्रिक्सप्रमाणे आणि सेबी सर्क्युलर मध्ये दिलेल्या शर्तींच्या अधीन असेल:

०१ एप्रिल, २०१९ पूर्वी हस्तांतरणासाठी सादरीकरण	भागधारकांकडे मूळ शेअर प्रमाणपत्राची उपलब्धता	विद्यमान विशेष कक्षात सादर करण्यासाठी पात्रता
नाही, हे नवे सादरीकरण आहे	हो	हो
हो, परंतु दस्तावेजातील त्रुटींमुळे फेटाळले/परत केले/दुर्लक्षित केले होते	हो	हो
हो, सादर केले होते	नाही	नाही
नाही, सादर केले नव्हते	नाही	नाही

अशा रीतीने हस्तांतरित केलेले शेअर्स अनिवार्यपणे हस्तांतरितींच्या डिमॅट अकाऊंट मध्ये जमा केले जातील आणि हस्तांतरणाच्या नोंदणीच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी लॉक-इन मध्ये असतील. सदर लॉक-इन कालावधीत असे शेअर्स हस्तांतरित/धारणाधिकार-चिन्हांकित / तारण होणार नाहीत. ह्या कक्षांतर्गत वादग्रस्त शेअर्सचे हस्तांतरण आणि आयईपीएफ कडे हस्तांतरित झालेले शेअर्स विचारात घेतले जाणार नाहीत.
जे पात्र भागधारक ह्या संधीचा लाभ घेऊ इच्छितात त्यांनी आवश्यक दस्तावेजांसह हस्तांतरण विनंती कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, (युनिट: रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड) कडे त्यांच्या कार्यालयात सेलेनियम टॉवर-बी, प्लॉट क्र. ३१ व ३२, गाचीबोवली, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद - ५०००३२ येथे सादर करावी.
पुढील माहितीसाठी, भागधारक www.sebi.gov.in येथे उपलब्ध सेबी सर्क्युलरवर पाहू शकतात किंवा एक ईमेल rinfra.investor@reliancegroupindia.com किंवा einward.ris@kfintech.com वर पाठवावा.
टीप:
कंपनी तिच्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सर्व पत्रव्यवहार प्राप्त करण्याकरिता त्यांचे ई-मेल आयडीज डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स् / केफिनटेक / कंपनी कडे नोंदवण्यास किंवा अद्ययावत करण्याकरिता प्रोत्साहन देत आहे. प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांनी कृपया सेबी मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी आणि जलद व सुरक्षित देवाणघेवाण सुकर होण्यासाठी त्यांच्या धारणाचे डिमटेरिअलायझिंग करण्यावर विचार करावा. ज्या सभासदांचे फोलिओज पॅन, केवायसी तपशील किंवा नामनिर्देशन पसंती सह अद्ययावत नाहीत त्यांनी कृपया einward.ris@kfintech.com येथे ई-मेल ने केफिनटेक कडे संबंधित आयएसआर फॉर्म्स सादर करून किंवा प्रत्यक्ष प्रत वरील पत्त्यावर पाठवून वरील तपशील अद्ययावत करावेत.

ठिकाण : मुंबई — **रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड साठी**
दिनांक : २२ जून, २०२६

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड — परेश राठोड
सीआयएन : एल७५१००एमएच१९२९पीएलसी००१५३० — कंपनी सेक्रेटरी
नों. कार्यालय : रिलायन्स सेंटर, तळ मजला,
१९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४००००१.
दू.: +९१ २२ ४३०३ १०००
ई-मेल : rinfra.investor@reliancegroupindia.com
वेबसाईट : www.rinfra.com

इशारा सूचना

आम्ही, एम/एस. टीडीजे असोसिएट्स, याद्वारे ही सावधानता सूचना सर्वसामान्य जनतेस देत आहोत की आमच्या अशील मंजुला भोगीलाल पंड्या या फ्लॅट क्र. १७, चौथा मजला, इमारत क्र. २, बोरिवली कैलास को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., सी.एस.टी. क्र. ५४, राम बाग, ऑफ एस. व्ही. रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२ येथे स्थित मिळकतीच्या (यापुढे ''सदर मिळकत'') कायदेशीर मालक आहेत.
आमच्या अशील या सदर मिळकतीच्या पूर्ण व निर्विवाद मालक असून मागील ४० वर्षांपासून सदर मिळकतीच्या कायदेशीर व प्रत्यक्ष ताब्यात आहेत. सदर सोसायटीचे शेअर प्रमाणपत्र देखील आमच्या अशील यांच्या नावावर आहे.
श्री. लक्ष्मण चव्हाण यांच्यासोबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्याचा मानस असलेल्या कोणत्याही व्यक्ती/संस्थेला याद्वारे सावध करण्यात येते की, अशा कोणत्याही व्यवहारामध्ये सहभागी होताना त्यांनी पूर्ण दक्षता घ्यावी, कारण श्री. लक्ष्मण चव्हाण यांना सदर मिळकतीमध्ये कोणताही हक्क, मालकी हक्क अथवा हितसंबंध नाही.
जर कोणतीही व्यक्ती/संस्था त्यांच्याशी किंवा त्यांच्या प्रतिनिधी, उत्तराधिकारी अथवा मुखत्यारांशी कोणताही व्यवहार करण्याचे निवडेल, तर तो व्यवहार त्यांच्या स्वतःच्या जोखीम, धोका, खर्च व त्यातून उद्भवणाऱ्या परिणामांवर असेल.
असा कोणताही व्यवहार आमच्या अशील यांच्या हक्क व दाव्यांविरुद्ध कायदेशीर व विधिसंगतरीत्या बंधनकारक, वैध किंवा अंमलात आणण्यायोग्य राहणार नाही.

दिनांक : २३.०६.२०२६
ठिकाण : मुंबई — **एम/एस. टीडीजे असोसिएट्स**
ऑफिस क्र. १०४, पहिला मजला,
३२, राजाबहादूर मॅन्शन,
बॉम्बे स्टॉक एक्सचेंज समोर, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१
ई-मेल : office@tdjassociates.com
मोबाईल : ९७७३७०८६२०

वकील एन व्ही जाधव
जाहीर नोटीस
वसई येथील मा. श्रीमती एस. एन. ढोलम, सहदिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, वसई यांचे न्यायालयात
विशेष दिवाणी दावा क. ४९/२०१५
नि.क. ३३
ने. ता. : ३०/०७/२०२६

Shivdev Chandrikaprasad Shukhla ......वादी
विरुद्ध
Kiran L. Ojha .....प्रतिवादी
प्रति,
Def. No. 1
Kiran L. Ojha Shop No. 5 Patel Apartment Taki Road Nallasopara East, Tal. Vasai Dist. Palghar

ज्याअर्थी सदरचे वादी हयांनी मे. सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, वसई यांच्या कोर्टात प्रस्तुतचा विशेष दिवाणी दावा क. ४९/२०१५ दाखल केला आहे. त्याअर्थी असे जाहीर करण्यात येते की सदरहु विशेष दिवाणी दावा मध्ये, प्रतिवादी क. १ यांच्यावर प्रत्यक्ष नोटीसीची बजावणी झालेली नसल्यामुळे ही जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत. तरी सदर प्रतिवादी क. १ अगर त्यांचे प्रतिनिधींनी त्यांची बाजु मांडण्यासाठी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत उपरनिर्दिष्ट प्रकरणी सामील होउन आपले लेखी म्हणणे नोंदवावे आणि तसेच या लेखावरुन असे कळविण्यांत येते की सदरहु मुदतीत आपले लेखी म्हणणे न आल्यास न्यायालय वादीचे म्हणणे ऐकुन प्रस्तुतच्या अर्जात निकाल देण्यांत देईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. सदर प्रकरणी पुढील **तारीख ३०/०७/२०२६** रोजी नेमण्यात आली आहे.
आज दि. ९/०९/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

SEAL — **हुकुमावरुन,**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, वसई

प्रपत्र क्र. ३ [नियम-१३(१)(ए) पहा]

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज बिल्डिंग, सेक्टर-३० ए, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

खटला क्र.: ओए/८९६/२०२५

कर्ज वसूली न्यायाधिकरण (कार्यवाही) रुल्स, १९९३ च्या नियम ५ च्या उप-नियम (२ए) सहवाचता ॲक्टच्या कलम १९ च्या उप-कलम (४) अंतर्गत समन्स.

स्टेट बँक ऑफ इंडिया — नि. क्र.: ९
विरुद्ध
तपस्या करनदीप अरोरा अरोरा

प्रति,
(१) **तपस्या करनदीप अरोरा अरोरा,** डी/डब्ल्यू/एस/ओ- करनदीप, राहाणार येथे. फ्लॅट क्र. सी/१०२, विनी हाइट्स, मंथन हॉटेल समोर, जी. लक्ष्मीबेन छेड्डा मार्ग, नालासोपारा पश्चिम, तालुका वसई, जिल्हा पालघर-४०१२०३, महाराष्ट्र-४०१२०३.
तसेच येथे : फ्लॅट क्र. ४०३, ए विंग, ज्युपिटर कॉम्प्लेक्स, बिल्डिंग क्र. २, पूजा प्लाझा जवळ, टाटा हाऊसिंगच्या मागे, बेटेगाव, बोईसर रोड, पालघर-४०१५०१, पालघर, महाराष्ट्र-४०१५०१.

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद **ओए/८९६/२०२५** नामदार प्रबंधक/पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **१५/१०/२०२५** रोजी सूचीबद्ध केला होता.
ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. २६,९६,६९४/-** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).
ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-
(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या **तीस** दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
तुम्हाला **११/०८/२०२६ रोजी स. १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **रजिस्ट्रार**समोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.
माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक: २२/०६/२०२६ रोजी दिले.

समन्स जारी करण्याकरीता प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी
शिक्का — **सही/- (संजय जयस्वाल)**
रजिस्ट्रार, डीआरटी- III, मुंबई

प्रपत्र क्र. १४
[नियम ३३(२) पहा]

कर्ज वसुली न्यायाधिकरण – १

भारत सरकार – वित्त मंत्रालय
एमटीएनएल भवन, २रा मजला, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई.

वसुली कार्यवाही क्र. ७३ सन २०२४

नि. क्र.: ९,
पुढील दिनांक : ३०.०६.२०२६

द साऊथ इंडियन बँक लि. ...प्रमाणपत्र धारक
विरुद्ध
मे. वनवर्ल्ड क्रिएशन्स प्रा. लि. आणि इतर. ...प्रमाणपत्र कर्जदार

मागणी सूचना

सन्माननीय पीठासिन अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या **ओ.ए. क्र. ८८ सन २०२०** मधील जारी केलेल्या **वसुली प्रमाणपत्रा**नुसार तुमच्याकडून रक्कम **रु. १०,६९,८५,८०८.४१/- (रुपये दहा कोटी एकोणसत्तर लाख पंच्याऐंशी हजार आठशे आठ आणि पैसे एकेचाळीस मात्र)** तसेच सदर ओए दाखल केल्याच्या दिनांकापासून प्रत्यक्ष वसुली होईपर्यंतचे पुढील व्याज आणि खर्चासह ही रक्कम आपणाकडून देय आहे.
तुम्हाला याद्वारे ह्या सूचनेच्या प्राप्तीच्या **(१५) पंधरा** दिवसांत वरील रक्कम प्रदान करण्याचे निर्देश देण्यात येते आहेत, अन्यथा कायदाच्या नियमांनुसार वसुली केली जाईल.
वरील रकमे व्यतिरिक्त तुम्हाला खालील रकमा सुद्धा भराव्या लागतीलः
(i) अंमलबजावणी कार्यवाहीच्या ह्या सूचनेनंतर तात्काळ सुरू होणाऱ्या कालावधी साठी देय असे व्याज तसेच दंडात्मक व्याज.
(ii) ही सूचना बजावणीच्या आणि थकबाकी रकमेच्या वसुलीकरिता केलेल्या अन्य सर्व उपाययोजनांच्या संबंधात आलेले सर्व खर्च, आकार आणि परिव्यय.
माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **२५ मे, २०२६** रोजी दिले.

दिनांक : २५.०५.२०२६ — **सही/-**
ठिकाण : मुंबई — शिक्का — **(यतींद्र कुमार सिन्हा)**
न्यायाधिकरणाचा शिक्का — **प्रभारी वसुली अधिकारी**
डीआरटी-१, मुंबई

प्रति,
सीडी २ : श्री. उर्विल अक्षय जानी,
मे. वन वर्ल्ड क्रिएशनचे संचालक/हमीदार, यांचा पत्ता येथे : फ्लॅट क्र. ९२बी, ९वा मजला, ॲडव्हेंट बिल्डिंग, जी. जे. भोसले मार्ग, सचिवालय, मुंबई - ४०००२१.
सीडी ३ : श्री. मनोज उत्तम खुशलानी
मे. वन वर्ल्ड क्रिएशनचे संचालक/हमीदार, यांचा पत्ता येथे : ६०२, ६ वा मजला, माणेक अपार्टमेंट, एस. व्ही. रोड, सेंट्रल बँक ऑफ इंडियासमोर, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई - ४०००५४.
सीडी ४ - श्रीमती आशिमा मनोज खुशलानी
मे. वन वर्ल्ड क्रिएशनचे संचालीका/हमीदार, यांचा पत्ता येथे : ६०२, ६वा मजला, माणेक अपार्टमेंट, एस. व्ही. रोड, सेंट्रल बँक ऑफ इंडियासमोर, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई - ४०००५४. — **...प्रमाणपत्र कर्जदार**

माननीय रजिस्ट्रार यांच्यासमोर
भारत सरकार, वित्त मंत्रालय
वित्तीय सेवा विभाग
मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण-II,

२रा मजला, टेलिफोन भवन, कुलाबा, मुंबई - ४००००५.

मूळ अर्ज क्र. ८७४ सन २०२३

निशाणी क्र. २८
दिनांक : १५.०६.२०२६

ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड ...अर्जदार
विरुद्ध
सरस्वती जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरी आणि इतर. ...प्रतिवादी

प्रति,
(i) **सूर्यकांता गोपिकिसन माहेश्वरी (प्रतिवादी क्र. २सी)** रा. मेन रोड, चौराई, जिल्हा - छिंदवाडा, मध्य प्रदेश - ४८०११५.
(ii) **लीना हरीश चांडक (प्रतिवादी क्र. २डी)** रा. भानुमती सोसायटी, लिंक रोड, बांगूर नगर पोलीस चौकीजवळ, मोतीलाल नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४००१०४.
(iii) **नितीन रमेशचंद्र दिदवानिया (प्रतिवादी क्र. ५)** श्री बालाजी, अभिषेक बंगल्या जवळ, लायन्स ज्ञानपीठ रोड, खामगाव - ४४४३१२.
ज्याअर्थी, वरील नमूद **ओ.ए. क्र. ८७४ सन २०२३** सन्माननिय पीठासीन अधिकारी डीआरटी-२, मुंबई समोर **३० नोव्हेंबर २०२३** रोजी सूचीबद्ध केला होता.
ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ५,९८,२३,१७५.५५/-** इ. च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध (ओए) दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर समन्स जारी केली.
ज्याअर्थी, सर्व सामान्य पद्धतीने समन्सची बजावणी होऊ शकला आणि ज्याअर्थी पर्यायी बजावणीसाठी अर्जाच्या मंजुरी सन्माननीय न्यायाधिकरणद्वारे मंजुरी दिली आहे. ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.
(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या **३० (तीस)** दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३(ए) अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मालमत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मालत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३(ए) अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मालमत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मालत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मालमत्तेची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मालमत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मालमत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मालत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
(vi) तुम्हाला **०८/१०/२०२६** रोजी स. ११.०० वा. लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे आणि **डीआरटी-II** च्यांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.
माझ्या हस्ते, आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक **१५ जून, २०२६** रोजी दिले.

सही/- रजिस्ट्रार
कर्ज वसुली न्यायाधिकरण-II,
मुंबई

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

प्रादेशिक कार्यालय, मुंबई (दक्षिण) : युनियन बँक बिल्डिंग, ६ वा मजला, ६६/८०, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

शुद्धिपत्र

दि फ्री प्रेस जर्नल आणि **नवशक्ती** (मुंबई आवृत्ती) मध्ये **२३.०५.२०२६** रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या व **२४.०६.२०२६** रोजीच्या ई-लिलावासंदर्भातील **मे. बॉन इंटरनॅशनल यांच्या खात्यातील अनुक्र. ३ व अनुक्र. ४** वरील मालमत्तांच्या ई-लिलाव विक्रीची प्रक्रिया तत्काळ प्रभावाने मागे घेण्यात येत आहे. लिलाव सूचनेतील इतर सर्व अटी व शर्ती यथावत राहतील.

सही/-
दिनांक : २३.०६.२०२६ — प्राधिकृत अधिकारी,
ठिकाण : मुंबई — **युनियन बँक ऑफ इंडिया**

SBI स्टेट बँक ऑफ इंडिया

एसएआरबी ठाणे – ११६९७ : स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी शाखा, १ला मजला, प्लॉट क्र. ए-११२, सर्कल रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे (पश्चिम)-४०० ६०४. **ई-मेल :** sbi.11697@sbi.co.in

स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना

जोडपत्र IV-A (नियम ८(६) चे परंतुक पहा)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार आणि हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रत्यक्ष कब्जात** घेतलेल्या तारणी धनकोंकडे गहाण/भारग्रस्त असलेली खाली वर्णन केलेली स्थावर मिळकत **श्री. हरिभाऊ अश्रोबा शिंदे** यांच्याकडून तारणी धनकोंना येणे थकबाकी असलेल्या ०७.०९.२०२१ रोजीसप्रमाणे रु. २५,६४,६६०/- **(रुपये पंचवीस लाख चौसष्ट हजार सहाशे साठ मात्र)** सह त्यावरील पुढील व्याज, आनुषांगिक खर्च आणि परिव्ययाच्या वसुलीसाठी **१८.०७.२०२६ रोजीस ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** तत्वावर विकली जाईल.
राखीव किंमत **रु. २४,००,०००/- (रु. चोवीस लाख मात्र)** आणि इसारा अनामत रक्कम **रु. २,४०,०००/- (रुपये दोन लाख चाळीस हजार मात्र) असेल.**
इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्याआधी लिलावात ठेवलेल्या मिळकतींवरील भार, त्यांचे मालकी हक्क आणि मिळकतीला बाधा आणणाऱ्या दावे/अधिकार/सोसायटी/ बिल्डर थकबाकीबाबत त्यांची स्वतंत्र चौकशी करून घ्यावी. ह्या संदर्भात ई-लिलावाची जाहिरात म्हणजे बँकेकडून कोणतेही वचन किंवा कोणतेही सांगणे असल्याचा अर्थ काढू नये किंवा तसा समज करून घेऊ नये.
बोली लावणाऱ्यांनी, **मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड**ने अवलंबलेल्या कार्यपद्धतीनुसार आवश्यक केवायसी कागदपत्रे आणि नोंदणी शुल्क सादर करून लिलावाच्या तारखेपूर्वीच **(https://baanknet.com)** या संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करून घ्यावी.
जाहीर ई-लिलावाची तारीख आणि वेळ आहे **१८.०७.२०२६** रोजी **स. १०.०० ते दु. ४.००** प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारासहीत.

मिळकतीचे तपशील

फ्लॅट क्र. ७०५, ७वा मजला, विंग ए-१, इमारत प्रकार-ए, उमा पॅराडाईज कॉम्प्लेक्स टाईप ए-१, बी-१ सीएचएसएल, गणपती मंदिर रोड, टिटवाळा (पू), ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१६०५, मोजमापित क्षेत्र ४१५ चौ. फू. चटई क्षेत्र + ५० चौ. फू. ओपन टेरेस, **श्री. हरिभाऊ अश्रोबा शिंदे** यांच्या नावावरील.
(प्रत्यक्ष कब्जा)

मिळकत आयडी क्र.	राखीव किंमत (रु. मध्ये)	इसारा अनामत रक्कम (रु.)	बोली वाढीची रक्कम (रु.)	निरीक्षणाची तारीख आणि वेळ
एसबीआयएन२०००५१२५३७२२	२४,००,०००/-	२,४०,०००/-	२५,०००/-	०८.०७.२०२६ स. ११.०० ते दु. २.०० वा.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनकोंची वेबसाईट : **www.sbi.co.in, https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others आणि https://baanknet.com** मध्ये दिलेली लिंक बघावी **किंवा श्री. चंद्रकुमार डी. कांबळे, सीएलओ मोबा. क्र. ७८७५५५१५६६ आणि अमित एम. साठे, सीओ मोबा. क्र. ९८३४९३७००१ यांना संपर्क साधावा.**

सही/-
दिनांक : २०.०६.२०२६ — **चंद्रकुमार डी. कांबळे**
ठिकाण : ठाणे — प्राधिकृत अधिकारी आणि मुख्य व्यवस्थापक, **स्टेट बँक ऑफ इंडिया**

SHRIRAM Asset Management
NURTURING TRUST, SHAPING DREAMS
associate with Sanlam group

श्रीराम ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड

सीआयएन : एल६५९९१एमएच१९९४पीएलसी०७९८७४
नोंदणीकृत कार्यालय : २१७, दुसरा मजला, स्वस्तिक चेंबर्स, एस.टी. व सी.एस.टी. रोड जंक्शनजवळ, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१. **दूरध्वनी क्र. :** ०२२-२७५७९३०१
ई-मेल आयडी : srmf@shriramamc.in, **वेबसाईट :** www.shriramamc.in

भौतिक समभाग हस्तांतरण आणि डिमटेरलाईज विनंती पुन्हा दाखल करण्यासाठीची विशेष खिडकी

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सेबी) यांनी दिनांक १ एप्रिल २०१९ पासून भौतिक समभागाचे हस्तांतरण खंडित केले होते. तथापि, सेबीद्वारे दिनांक १ एप्रिल २०१९ पूर्वी मुलत: सादर करण्यात आलेल्या परंतु दस्तांऐवजांच्या कमतरतेमुळे परत करण्यात आलेल्या भौतिक समभागाची हस्तांतरण विनंती पुन्हा दाखल करणासाठी दिनांक ७ जुलै २०२५ ते दिनांक ६ जानेवारी २०२६ या कालावधी दरम्यान विशेष खिडकी खूली करण्यात आली होती.
गुंतवणूकदारांच्या सोयीसाठी सेबीने त्यांच्या परिपत्रक क्रमांक एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी पीओडी/आय/३७५०/२०२६ दिनांक ३० जानेवारी २०२६ अन्वये, दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ ते दिनांक ४ फेब्रुवारी २०२७ या दरम्यान एका वर्षासाठी पुन्हा विशेष खिडकी खुली करण्याचा निर्णय घेतला आहे. भौतिक समभागाच्या हस्तांतरणाकरिता सदर विनंती विशेष खिडकीच्या अंतर्गत दाखल करतेवेळी मुळ भौतिक समभाग सादरीकरण करणे खालीलप्रमाणे अनिवार्य आहे.

हस्तांतरण करार अंम लबजावणी दिनांक	१ एप्रिल २०१९ पूर्वी हस्तांतरणासाठी सादर केले होते का?	मूळ प्रतिभूती प्रमाणपत्र उपलब्ध आहे का?	वर्तमान खडकीअंतर्गत सादर करण्यास पात्र आहे का?
दिनांक १ एप्रिल २०१९ पूर्वी	नाही (ही नवीन सादरीकरण विनंती आहे)	होय	✔
	होय (पूर्वी नाकारण्यात आले/परत करण्यात आले होते)	होय	✔
	होय	नाही	✘
	नाही	नाही	✘

याव्यतिरिक्त, पुढील प्रकरणे देखील या विशेष खिडकीअंतर्गत विचारात घेतली जाणार नाहीत:
- हस्तांतरक व हस्तांतरिती दरम्यान विवाद असलेली प्रकरणे.
- गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आलेले समभाग.

टीप : सदर कालावधीदरम्यान दाखल केलेले सर्व समभागांचे हस्तांतरण डिमॅट पध्दतीने प्रक्रियान्वित होतील. अर्थात असे समभाग केवळ डिमटेरलाईज (डिमॅट) स्वरूपातच वितरित करण्यात येतील आणि ते एक वर्षाच्या कालावधीसाठी लॉक-इन असतील.
यासंदर्भात कोणतीही अधिक माहिती अथवा स्पष्टीकरणासाठी संबंधित भागधारकांनी खाली दिलेल्या कोणत्याही पत्त्यावर कंपनी / नोंदणी व हस्तांतरण प्रतिनिधी (आरटीए) यांच्याशी संपर्क साधावा.

श्रीराम ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड	**पूर्वा शेअरजिस्ट्री इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**
२१७, दुसरा मजला, स्वस्तिक चेंबर्स, एस.टी. व सी.एस. टी. रोड जंक्शनजवळ, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१. दूरध्वनी क्र. : ०२२-२७५७९३०१ ई-मेल आयडी : srmf@shriramamc.in वेबसाईट : www.shriramamc.in	९, शिवशक्ती इंडस्ट्रियल इस्टेट, जे. आर. बोरिचा मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०० ०११. दूरध्वनी क्र. : ०२२-४९६१४१३२ ई-मेल आयडी : support@purvashare.com वेबसाईट : www.purvashare.com

श्रीराम ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड करीता
सही/-
ठिकाण : मुंबई — **विनीता ए. कपूर**
दिनंक : २२.०६.२०२६ — **कंपनी सचिव व प्रमुख - विधि विभाग**

केनरा बैंक Canara Bank

प्रादेशिक कार्यालय : कोल्हापूर-४१६००१
दूरध्वनी क्र. ०२१७-२३०२७५७, विस्तार क्र. ११७
ईमेल: recoveryrosolapur@canarabank.com,

कब्जा सूचना (कलम १३(४))
(स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकर्ता हे कॅनरा बँकेचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने **सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (ॲक्ट ५४ सन २००२)** (यानंतर ॲक्ट म्हणून संबोधले जाईल) आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **०२.०२.२०२६** रोजी मागणी सूचना जारी करून रोजी कर्जदार **कृष्णात सदाशिव पाटील आणि अश्विनी कृष्णात पाटील तसेच अमर आनंदा कोंडेकर (हमीदार)** यांना सूचनेतील नमूद रक्कम म्हणजेच **रु. ९,४२,८४०.६५** या रकमेची परतफेड सदर सूचना तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.
सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील वर्णिलेल्या मिळकतीचा **कब्जा** त्याला/तिला सदर ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर रुल्सच्या नियम ८ आणि ९ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ह्या **२२ जून, २०२६** रोजी घेतला आहे.
विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार कॅनरा बँक, **रु. ८,७६,४७२.८५** आणि त्यावरिल व्याजाच्या भाराअधिन राहिल.
तारणमत्तांच्या भरणासाठी उपलब्ध वेळेसंदर्भात ॲक्टच्या कलम १३ (८) अन्वये कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जाते.

स्थावर मिळकतीचे वर्णन

ग्रामपंचायत मिल्कटचे चे ते सर्व भाग आणि विभाग क्र. १६५ए क्षेत्र ५७६.८ चौ.फू. गाव नंदवाल पाटील गल्ली तालुका करवीर कोल्हापूर महा
सीमाबद्ध -
पूर्व - महादेव पाटील मिल्कट क्र. १६४ए
पश्चिम - वसंत पाटील मिल्कट क्र. १८१ के
दक्षिण - रस्ता
उत्तर - मारुती पाटील मिल्कट क्र. १८०

सही/-
प्राधिकृत अधिकारी
दिनांक : २२.०६.२०२६ — **(विभागीय व्यवस्थापक)**
ठिकाण : कोल्हापूर — **कॅनरा बँक**

वकील ब्रिजेश पांडे
जाहीर नोटीस
वसई येथील मा. श्रीमती अर्चना गणेश बेहेरे दिवाणी न्यायाधिश व स्तर, वसई हयांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज ९७/२०२६
नि. क्र. 5
ने. ता. २१/०७/२०२६

Smt. Rajeshree Vinod Nirmal, Age 43 years, Hindu, Indian Inhabitant of District Palghar, Occupation: Self employes Residing at Flat No. 403, B-wing, Building No.1, Viva Vedanta Tower, National School Road, Virar (East), Vasai, Dist: Palghar 401305, Maharashtra, Mobile-9325808445 being sole Executant and Beneficiary Under the will of the Deceased abovenamed
विरुध्द
कोणीही नाही.
ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी दिनांक २६/०२/२०२५ रोजी मयत विनायक आत्माराम पंडित यांच्या मालमत्ते संबंधी प्रोबेट दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज ९७/२०२६ दाखल केला आहे.

मालमत्तेचे वर्णन

A residential Flat No. 105, B-Wing, Viva Vedanta Complex, Building No.1, Manvelpada road, Virar (East), Vasai, Palghar - 401 305, Maharashtra
त्याबाबत ज्या कोणी इसमास त्यांचे कायदेशीर वारस, हक्क, हितसंबंध किंवा हरकत असेल त्यांनी हया न्यायालयांत **दिनांक २१/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** किंवा ही नोटीस प्रसिध्द झाले पासून एक महिन्याचे आत लेखी हरकत दाखल करावी. सदरहू वारस दाखला देण्याबाबत जर कोणत्याही इसमाची हरकत न आल्यास योग्य ते पुरावे व कागदपत्रे घेऊन अर्जदार हयांना वारस दाखला देण्यात येईल हयाची कृपया नोंद घेण्यात यावी.
आज दि. १६/०६/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

SEAL — **हुकुमावरुन,**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर वसई

जाहिर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की माझे अशील श्री झैन नानालाल पालन यांनी प्लॉट क्र. १६, सीटीएस क्र. ९९६, क्षेत्रफळ ८१८ चौ. मीटर, आयसी कॉलनी जवळ, बोरीवली, मुंबई - ९२ येथील मिळकत (सदर मिळकत) दिनांक ०२/०६/२०२२ च्या एमओयू अन्वये खरेदी केली असून, सदर मिळकतीच्या मोबदल्याचा भाग म्हणून माझ्या अशिलांनी रु २,३२,००,०००/- (रुपये दोन कोटी बत्तीस लाख फक्त) इतकी रक्कम अदा केली आहे. माझ्या अशिलांनी कल्पेश कानुभाई शाह व इतर पाच जणांविरुद्ध फसवणूक तसेच विश्वासभंगाचा गुन्हा केल्याबद्दल एमएचबी पोलीस स्टेशन, बोरिवली, मुंबई येथे एफआयआर क्र. २७२/२०२५ दाखल केला आहे. तसेच माझ्या अशिलांनी सदर मिळकतीबाबत तृतीय पक्ष हक्क निर्माण करू नयेत यासाठी प्रतिबंधक आदेशाकरिता दिवाणी दावा क्र. २३३५/२०२६ दाखल केला आहे. म्हणून सर्व व्यक्ती, कंपनी अथवा निगमित संस्था यांना याद्वारे सावध करण्यात येते की सदर मिळकत वादग्रस्त असून न्यायालयीन कार्यवाहीचा विषय आहे. त्यामुळे कोणीही सदर मिळकत खरेदी करू नये.

मुंबई येथे, दिनांक २२ जून २०२६.
ए. के. चौहान
अधिवक्ता, उच्च न्यायालय, बॉम्बे
१४६, अशोका शॉपिंग सेंटर,
एल. टी. मार्ग,
मुंबई - ४००००१.

जाहीर सूचना

सूचना तमाम जनतेला याद्वारे देण्यात येते की आम्ही आमचे अशील **शांभवी ॲण्ड मेट्रो डेव्हलपर्स,** यांचे कार्यालय येथे, ३०२, आयफेल टॉवर, नेस्बिट रोड, जीएस भवन समोर, माझगाव, मुंबई- ४०० ०१० यांनी सदरहु मालक असलेल्या मोगल लेन, माहिम, मुंबई- ४०००१६ येथे स्थित इमारतीमधील तिचे नोंदणीकृत कार्यालय असलेल्या आणि नोंदणी क्र. एचएसजी/जीएन/६५९२/१९८३ दिनांकित २४-०३-१९८३ धारक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदी अंतर्गत नोंदणीकृत एक को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, **प्रभू को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (सोसायटी)** कडून याखालील लिखित परिशिष्टात अधिक तपशीलवारपणे विवर्णित मिळकत **(सदर मिळकत)** च्या संदर्भात विकास अधिकार देण्यासाठी वाटाघाटी केल्या आहेत.
सर्व व्यक्ती, ज्यामध्ये वैयक्तिक व्यक्ती, कंपनी, बँका, वित्तीय संस्था, बिगर-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म, व्यक्तींची संघटना किंवा व्यक्तींचा समूह नोंदणीकृत असो वा नसो, कर्जदाता किंवा धनको ज्यांना वरील नमूद मिळकतींमध्ये किंवा त्यातील कोणत्याही भागात किंवा भागामध्ये कोणत्याही स्वरूपाचा कोणताही अधिकार, दावा, मागणी, हक्क, मालकी, हिस्सा आणि/किंवा हितसंबंध असल्याचा दावा असेल, जो विक्री, विक्री करार, हस्तांतरण, अभिहस्तांकन, अदलाबदल ज्यामध्ये टीडीआर वापर किंवा एफएसआय किंवा कोणतेही बिल्ट अप क्षेत्र जे बांधकामित आणि/किंवा बांधकाम होणारे किंवा होऊ घातलेला असो, किंवा वारसा, हिस्सा, गहाण, विक्री, हस्तांतरण, धारणाधिकार, परवाना, प्रभार, विश्वस्त, लेखी करार, दावा, देखभाल, निवासाचा हक्क, सुविधाधिकार, मार्गाचा हक्क, प्री-एम्पशन, भेट, अदलाबदल, अभिहस्तांकन, ताबा, वाटप, भोगवटा, भाड्याने देणे, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, उप परवाना, कुळवहिवाट, उप कुळवहिवाट, कागदपत्र, मृत्यु, मृत्युपत्रीत दान, विभाजन, दावा, मनाई आदेश, संपादन, मागणी, जप्ती, प्रलंबित वाद, बोजा, विश्वस्तीद्वारे लाभकारी हक्क/हितसंबंध, प्रिस्किप्शन किंवा प्री-एम्प्शन, करार, कंत्राट, सामंजस्य करार, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, हक्कत्याग, मुखत्यारपत्र, मागणी किंवा हुकूम किंवा निकाल जे कोणत्याही न्यायालय किंवा प्राधिकरणाद्वारे पारित केलेले, आरक्षण, विकास हक्क, संयुक्त उपक्रम, व्यवस्था, भागीदारी, कर्ज, अग्रिम, कायद्याच्या अंमलबजावणीद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे वरील नमूद मिळकतींमध्ये कोणताही दावा किंवा हितसंबंध असल्याचा दावा करणारे **(''दावे'')**, यांनी त्यांच्या अशा दाव्याची किंवा हितसंबंधाची सर्व सहाय्यक कागदपत्रे किंवा पुराव्यांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह लेखी स्वरूपात अधोस्वाक्षरीकारांना **एबीएस अन्सारी अँड कंपनी ॲडव्होकेट्स, ३०२/बी, आयफेल टॉवर, नेस्बिट रोड, जीएसटी भवन समोर, माझगाव, मुंबई ४०० ०१०,** येथे सदरहु तारखेपासून **२१ दिवसांच्या** आत कळवावे; अन्यथा असे समजले जाईल की कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत आणि ते असल्यास ते त्याग केलेले किंवा सोडून दिलेले मानले जातील आणि आमचे अशील कोणत्याही अशा दाव्याचा संदर्भ न घेता व्यवहार पूर्ण करण्यास पुढे जातील.

वरील संदर्भित मिळकतीचे परिशिष्ट :

माहिम विभागाच्या टाउन प्लॅनिंग स्कीम क्र. III चा अंतिम प्लॉट क्र. २८७ धारक आणि त्याखालील जमीन असलेल्या मोगल लेन, माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे स्थित असलेले आणि वसलेले तळ किंवा जमिन, मोजमापित ४३२.२८ चौ. मीटर (यापुढे **''जमीन''** म्हणून संदर्भित) सह त्यावरील उभी **''प्रभू बिल्डिंग''** म्हणून ओळखली जाणारी इमारत ज्यामध्ये तळ अधिक ३ वरचे मजले समाविष्टीत आणि २१ (एकवीस) निवासी फ्लॅट्सचा समावेश (यापुढे ''इमारत'' म्हणून संदर्भित) चे **ते सर्व** भाग आणि विभाग.
दिनांकित सदर २३ जून, २०२६.

एबीएस अन्सारी अँड कं.
वकील, उच्च न्यायालय
३०२/बी, आयफेल टॉवर, नेस्बिट रोड, जीएसटी भवन समोर, माझगाव, मुंबई ४०० ०१०.

प्रपत्र क्र. १४
[नियम ३३(२) पहा]
नोंद. एडी/स्पीड पोस्ट/चिटकविणे/दस्तीद्वारे

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई येथे

वित्त मंत्रालय, भारत सरकार
३रा मजला, एमटीएनएल भवन, स्ट्रँड रोड, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४००००५.

मागणी सूचना

द रिकव्हरी ऑफ डेबटस अँड बँक्रप्ट्सी ॲक्ट, १९९३ ची कलम २५ ते २८ आणि आयकर अधिनियम, १९६१ च्या द्वितीय परिशिष्टातील नियम २ अन्वये सूचना.

नि.: ३
पुढील तारीख :- २१/०७/२०२६
आर.सी. क्र. २१ सन २०२५ — **मुदतवाढ दिनांक १६/०६/२०२६ ते २१/०७/२०२६ पर्यंत**
एचडीएफसी बँक लि. ....अर्जदार
विरुध्द
राजू धनराज पुनमिया ....प्रतिवादी

प्रति,
सीडी - राजू धनराज पुनमिया,
३०४-बी, सिद्धिगिरी अपार्टमेंट, राजकमल स्टुडिओ लेन,
डॉ. एस. एस. मार्ग, परळ, मुंबई - ४०००१२.
आणि येथे देखील
गोल्ड प्रिन्स, ऑफिस क्र. ३१४, ३रा मजला, बुसा उद्योग भवन, टोकारशी जिवराज रोड, शिवडी नाका जवळ, शिवडी, मुंबई - ४०००१५.
याद्वारे अधिसूचित करण्यांत येते की, तुमच्याकडून **ओ. ए. क्र. १७४ सन २०१४** मध्ये सन्माननिय पीठासिन अधिकारी, **कर्ज वसूली न्यायाधिकरण II मुंबई,** यांनी पारित केलेल्या आदेशाने जारी केलेल्या वसुली प्रमाणपत्रानुसार रक्कम **रु. १५,१५,६५८/- (रुपये पंधरा लाख पंधरा हजार सहाशे अठ्ठावन्न मात्र)** ची रक्कम देय झाले आहेत. अर्जदारास ही रक्कम **१५,१५,६५८/- (रुपये पंधरा लाख पंधरा हजार सहाशे अठ्ठावन्न मात्र)** व्याज, खर्च दिनांक **१९.०५.२०१४** पासून देयक अदा होईपर्यंत/वसुली होईपर्यंत आणि भविष्यातील वार्षिक **@ १२%** व्याजासह संयुक्त आणि स्वतंत्रपणे सीडी कडून वसुली करण्यास हक्कदार आहे.
तुम्हाला सूचना मिळाल्यापासून **१५ दिवसांच्या** आत वरील रक्कम भरण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, अन्यथा कर्ज व दिवाळखोरी कायदा, १९९३ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार वसुली केली जाईल.
वरील रकमे व्यतिरिक्त तुम्हाला खालील रकमा सुद्धा भराव्या लागतीलः
(ए) प्रमाणपत्र/निष्पादन प्रक्रियेच्या ह्या सूचनेनंतर तात्काळ सुरू होणाऱ्या कालावधी साठी देय असे व्याज
(बी) ही सूचना आणि वॉरंटस् च्या बजावणीच्या व थकबाकी रकमेच्या वसुलीकरिता केलेल्या अन्य सर्व उपाययोजनांच्या संबंधात आलेले सर्व खर्च, आकार आणि परिव्यय.
तुम्हाला पुढील कार्यवाहीसाठी दिनांक **२१/०७/२०२६** रोजी **दु. १२.०५ वा.** अधोस्वाक्षरीकारांसमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात येत आहेत.
माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **१३/०४/२०२६** रोजी दिले.

सही/-
शिक्का — **श्री. भविष्य कुमार आझाद**
वसुली अधिकारी
डीआरटी-२, मुंबई.

जाहिर सूचना

याद्वारे **सूचित** करण्यात येते की माझे अशील सध्या एम/एस. ग्रीन गेट रियाल्टर्स, ही एक नोंदणीकृत भागीदारी फर्म, ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ९/बी, वीर सावरकर रोड, बाउगे फातमा, इस्माईल हाजी बिल्डिंग कंपाऊंड, माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे असून, तिचे विद्यमान व एकमेव भागीदार सौ. रुमाना शादाब खान उर्फ रुमाना अछवा, श्री. साबिर फरहान मुर्तुझा अछवा, सौ. परवीन बशीर अली अछवा, श्री. मुहम्मद बुरहान बशीर अछवा, कु. रुही बशीर अछवा आणि श्री. फैहान बशीर अछवा (यापुढे **''मालक''**) यांच्याशी, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीच्या (**''मिळकत''**) पुनर्विकासासाठी विकास हक्क संपादन करण्याबाबत वाटाघाटी करीत आहेत, सर्व बोजामुक्त स्वरूपात, आणि त्या अनुषंगाने मी सदर मालकांचे मिळकतीवरील हक्क, मालकीहक्क व हितसंबंध यांची चौकशी करीत आहे.
मिळकतीमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, परवाना, लीव्ह अँड लायसन्स, केअरटेकर आधार, भाडेकरार, पोटभाडेदारी, हस्तांतरण, मुक्तता, हक्कत्याग, गहाण, वारसा, मृत्युपत्रीय दान, उत्तराधिकार, भेट, ग्रहणाधिकार, प्रभार, देखभाल, सुखभोगाधिकार, विश्वस्त व्यवस्था, मालकी दस्तऐवज, वास्तव्य, ताबा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, न्यायप्रविष्ट वाद किंवा कोणत्याही करार, दस्त, दस्तऐवज, लेखी नोंद, हस्तांतरण दस्त, मृत्युपत्रीय तरतूद, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/समझोते, विकास हक्क, विकास व्यवस्थापक, प्रकल्प व्यवस्थापक, भागीदारी, सामंजस्य करार, टर्म शीट, एफएसआय वापर, किंवा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारे, मिळकतीत, मिळकतीबाहेर किंवा मिळकतीवर कोणताही हिस्सा, हक्क, मालकीहक्क, दावा, आक्षेप, लाभ, मागणी आणि/किंवा हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्ती/संस्थांनी त्याबाबतची संपूर्ण व प्रमाणित सत्यप्रत कागदोपत्री पुराव्यासह अधोहस्ताक्षरी यांना जी-०१, माखन धाम, ११ वा रोड, पी. डी. हिंदुजा हॉस्पिटल (खार) शेजारी, खार (पश्चिम), मुंबई - ४०००५२ येथे या जाहिर सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळवावे. निर्धारित १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत असा कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही किंवा तो त्याग केलेला अथवा सोडून दिलेला आहे असे मानले जाईल आणि तो माझ्या अशीलांवर किंवा मिळकतीवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही.

वरील संदर्भित मिळकतीचे परिशिष्ट

सर्व ती जमीन, त्यावरील इमारत व संरचना (ज्यात भुईमजला अधिक दोन मजली रचना असून त्यामध्ये २४ सदनिका आहेत व सध्या २४ भाडेकरू/राहिवासी यांच्या ताब्यात आहेत), ''पटकर ब्लॉक्स'' (ज्याला धाबोलकर निवास किंवा धाबोलकर ब्लॉक्स म्हणूनही ओळखले जाते) या नावाने ओळखली जाणारी, वांद्रे (पश्चिम) विभागातील सिटी सर्व्हे क्र. एफ/१४०४ धारण करणारी, क्षेत्रफळ अंदाजे १८३७ चौ. यार्डस (१५३५.९७ चौ. मीटर समतुल्य), तर प्रॉपर्टी कार्डनुसार क्षेत्रफळ १४३४.३० चौ. मीटर असून महानगरपालिका क्र. ११/७, महानगरपालिका वार्ड 'एच' वार्ड क्र. एचडब्ल्यू-६१८८ (१) व (२बी), स्ट्रीट क्र. १५ धारण करणारी, डॉ. बांबर्डेकर रोड, गुरु नानक रोडजवळ, वांद्रे (पश्चिम), मुंबई येथे स्थित, गाव वांद्रे, तालुका अंधेरी, मुंबई उपनगर नोंदणी जिल्ह्याच्या हद्दीत असलेली आणि ज्याच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

उत्तर दिशेस : बांबर्डेकर रोड.
दक्षिण दिशेस : अंशतः सी.टी.एस. क्र. १४०० धारण करणारी जमीन व अंशतः सी.टी.एस. क्र. १३९९ धारण करणारी जमीन.
पश्चिम दिशेस : सी.टी.एस. क्र. १४०३ धारण करणारी जमीन.
पूर्व दिशेस : सी.टी.एस. क्र. एफ/१४०५ धारण करणारी जमीन.

दिनांक २३ जून, २०२६. — **आनंद नागवेकर**
सही/-
अधिवक्ता